# फळसेवाडी हितकारी संस्था
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : शनिवार १२ ऑगष्ट २०१७.
**स्थळ** : १४ कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – ४०० ०५३

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे – अध्यक्ष | 11. श्री सुनिल विनायक राणे (आमंत्रित) |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे – सचिव | 12. श्री लवू शिवाजी राणे (आमंत्रित) |
| 3. श्री उदय भगवान राणे – खजिनदार | 13. श्री गंगाराम महादेव राणे (आमंत्रित) |
| 4. श्री दशरथ दत्ताराम साटम | |
| 5. श्री पांडुरंग सावजी राणे | |
| 6. श्री जयवंत नाना राणे | |
| 7. श्री शंकर बाळकृष्ण राणे | |
| 8. श्री रंजन रावजी म्हसकर | |
| 9. श्री हेमंतकुमार रमेश राणे | |
| 10. श्री अशोक दत्ताराम राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारिणीची सभा संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचे निवासस्थानी (शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल येथे) घेण्यात आली. सभेस कार्यकारीणीतील १० सदस्य तसेच ३ आमंत्रित ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री सुनिल सदानंद राणे, सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करताना सचिवांनी प्रथमत: विषयपटलावरील विषय उपस्थितांस वाचून दाखविले.

विषय क्रमांक १ अंर्तगत श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी माहीती दिली की दिनांक १७ जून २०१७ रोजी झालेल्या कार्यकारीणीच्या सभेचे इतिवृत्त काही वैयक्तिक कारणांमुळे तयार करता आले नाही. हे इतिवृत्त तयार करून कार्यकारीणीच्या पुढील सभेत मंजूरीसाठी मांडण्यात येईल. उपस्थितांनी याची नोंद घेऊन पुढील सभेत इतिवृत्त मंजूरीसाठी ठेवण्याची सूचना केली.

विषय क्रमांक २ अंर्तगत सचिवांनी माहीती दिली कि दिनांक १७ जून २०१७ नंतर संस्थेच्या सभासदांस दिनांक २२ जून २०१७ रोजीच्या आवाहनस्वरुपी पत्र पाठवून इतर विषयाबरोबर थकबाकीचा भराणा करण्याची विनंती करण्यात आली होती.

सचिवांनी उपस्थितांस पुढे माहिती दिली की संस्थेच्या या आवाहनास प्रतिसाद देऊन श्री रविंद्र भगवान राणे यांनी संस्थेचे सभासद असलेल्या आपल्या दिवंगत कुटूंबियांच्या थकबाकीची तसेच आपल्या थकबाकीसोबत आर्थिक वर्ष २०१७ - १८ च्या वार्षिक वर्गणीची देय रक्कम धनादेशाव्दारे अदा केली.

सचिवांनी पुढे सांगितले की श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सभासद नोंदणी फार्म तसेच पावती पुस्तकांची छपाई करून घेऊन सभासद नोंदणी मोहिमे अंर्तगत नियुक्त करण्यात आलेल्या कार्यकारीणी सदस्यास दिंनाक २८ जून २०१७ च्या पत्राव्दारे फार्म व पावती पुस्तके पाठविण्याचे काम केले आहे तसेच त्यांनी प्रत्येक प्रतिनिधीस विचारणा करून फार्म व पावती पुस्तके पोहोचल्याची खात्री केलेली आहे.

सचिवांनी पुढे माहीती दिली की टेंबावरील ग्रामस्थांनी काही काळापूर्वी विहीर फंड स्थापन केला होता व त्या फंडामध्ये ग्रामस्थांच्या सहभागाने रु.८६,०००/- (रुपये शहाऐंशी हजार फक्त) एवढी रक्कम उभी केली होती. त्या रक्कमेपैकी सध्या रु.१६,२२१.७५ इतकी रक्कम बँक खात्यामध्ये शिल्लक असून श्री मंगेश मनोहर राणे यांचेकडे रु.७,५००/- शिल्लक आहेत. सध्या विहीरीसाठी असा वेगळा फंड उभारण्याची गरज वाटत नसल्यामुळे या फंडामध्ये सामील झालेल्या ग्रामस्थांस दिनांक ९ ऑगष्ट २०१७ रोजी पत्र पाठविण्यात आले असून हा उर्वरीत रु.२३,७२१.७५ फंड संस्थेच्या फंडात विलीन करण्याची परवानगी मागितलेली आहे.

सचिवांनी पुढे माहीती दिली की मागील कार्यकारीणीच्या सभेत ठरविल्यानुसार श्री रंजन रावजी म्हसकर यांच्या प्रयत्नांतून आमदार श्री नितेश नारायणरावजी राणे यांची दिनांक ३० जुलै २०१७ रोजी त्यांचे निवासस्थानी भेट घेण्यात आली व त्यांस संस्थेतर्फे निवेदन देण्यात आले, ही भेट आकस्मित ठरल्यामुळे कार्यकारीणी सदस्यांपैकी श्री रंजन रावजी म्हसकर, श्री उदय भगवान राणे, श्री शंकर बाळकृष्ण राणे आणि श्री दशरथ दत्ताराम साटम भेटीच्यावेळी उपस्थित राहू शकले. श्री नितेश नारायणराव राणे यांनी त्यांस दिलेल्या निवेदनाची प्रत त्यांच्या कणकवली येथील स्थानिक कार्यालयात देण्याची सूचना केली असून गणपती उत्सवादरम्याण गावी आल्यावर त्यांची भेट घेण्याची सूचना केली आहे.

विषय क्रमांक ३ अर्तंगत दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी घेण्यात आलेल्या सभेचे इतिवृत्त ग्रामस्थास वितरीत करावयाचे का ? याबाबत चर्चा करण्यात आली. उपस्थितांनी याबाबत विचार मांडला हे इतिवृत्त १०२ ग्रामस्थांस वितरीत करण्याचे ठरविल्यास विनाकारण पोष्टेजचा खर्च करावा लागेल. त्यामुळे हे इतिवृत्त प्रत्येक सभासदास / ग्रामस्थास वितरीत न करता संस्थेच्या संकेत स्थळावर टाकून त्याबाबतची माहीती सभासदांना दिल्यास संकेत स्थळावर भेट देऊन त्यास ते पाहता येईल व खर्चाची बचतही होईल.

विषय क्रमांक ४ अंर्तगत सचिवांनी सभासद नोंदणी प्रगतीचा आढावा घेतला असता असे आढळून आले की या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या बहुतांशी प्रतिनिधीनी ग्रामस्थांची भेट घेणे सूरू केलेले नाही. सचिवांनी उपस्थितांना याबाबत स्वत:हून पुढाकार घेऊन लवकरात लवकर सभासद नोंदणी अभियान पूर्णत्वास नेण्याची विनंती केली.

विषय क्रमांक ५ अंर्तगत सचिवांनी माहीती दिली गणपती उत्सवापूर्वी सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करण्याची जबाबदारी श्री दशरथ दत्ताराम साटम यांचेवर मागील कार्यकारीणी सभेत सोपविण्यात आलेली असून त्याबाबत त्यांचे स्थानिक कार्यकारीणी सदस्य श्री संकेत रत्नाकर राणे यांचेशी बोलणे झालेले असल्याची माहिती दिली.

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून सचिवांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

या कार्यक्रमाचा चहापाणी खर्च संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

---